३. विशेष पर्याय निवडल्यास त्यास आवश्यक शिक्षक प्रशिक्षण, कार्यभार वाढीमुळे अतिरिक्त शिक्षक मागणी नसणे. योग्य भौतिक सुविधा तपासणे योग्य आहे पण संरक्षणशास्त्र हा विषय अधिकृत विषय आहे.

४. ग्रेड सब्जेक्टबाबत नियोजनानुसार मूल्यमापन करुन बोर्डाला कळविले जाते ती थेट ग्रेड लिस्टवरुन निकालपत्रावर येते. कोणतीही वेगळे काम करावे लागत नाही. उदा.प्रश्नपत्रिका, स्टेशनरी व अन्य साहित्य परीक्षण मानधन इ.

वरीलप्रमाणे मुद्दे विचारात घेता महाराष्ट्रातील सुमारे ८५% ते ९०% शाळांमध्ये समाजसेवा हा एकच वैकल्पिक विषय घेतला जात होता. व त्याऐवजी आता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या दिनांक १४ जून २०१८ च्या परिपत्रकानुसार स्काउट गाईड/ नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. विषय चालू करावयाचा असेल तर त्या विषयांना शासनाची मान्यता घेणे शाळांना गैरसोईचे तसेच विद्यार्थ्यांनाही खर्चिक ठरते. मात्र संरक्षणशास्त्र विषय घेणे वा त्यास मंडळ मान्यता घेणे सोयीस्कर होते. यास्तव ज्या शाळांनी सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ मध्ये नवीन अभ्यासक्रमानुसार संरक्षणशास्त्र हा विषय वैकल्पिक विषय म्हणून सुरु केला आहे अशा शाळांनी सदर विषयास मंडळ मान्यता घेण्याची व त्यासाठी विहित शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. मात्र शाळांनी संरक्षणशास्त्र विषय सुरु केल्याचा तपशील सोबतच्या प्रपत्रात विभागीय मंडळाकडे सादर करणे आवश्यक राहिल.

मात्र सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून संरक्षणशास्त्र विषय नव्याने सुरु करणाऱ्या शाळांना त्यांच्या मागणीनुसार प्रचलित पध्दतीप्रमाणे मंडळाची विषय मान्यता देण्यात यावी व त्यासाठी विहीत शुल्क आकारण्यात यावे. उर्वरित स्काउट गाईड/ नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. या विषयांच्या मान्यतेबाबत संदर्भीय पत्र क्र.२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

वरीलप्रमाणे शालेय श्रेणी विषय मान्यतेबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळास सादर करण्यात यावा.

प्र. सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

पत्र क्रमांक : नाविमं / प.मा. / मान्यता / 2796
नागपूर , दिनांक 26.07. 2018

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
नागपूर विभाग, नागपूर

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रानुसार विषय मान्यतेची कार्यवाही करण्यात यावी.

(रविकांत देशपांडे)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.